# प्रेसनोट दि. १७/०४/२०१९

## बाणेर येथे सापळा रचुन छाप्यामध्ये ०१ गुजरात राज्य व ०२ मुंबई शहरातील मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका

दि.१६/०४/२०१९ रोजी पोलीस हवालदार नरेश बलसाने यांना माहिती मिळाली की, बाणेर येथे वेश्या व्यवसयासाठी मुली पुरविल्या जात असल्याबाबत व त्यांच्यावर दबाव टाकून वेश्या व्यवसाय करुन घेत आहे अशी खात्रीशिर माहिती मिळाली.

मिळालेल्या माहिती वरुन मा. भानुप्रताप बर्गे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे २ व वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, सामाजिक सुरक्षा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली स्टाफ मार्फत छापा कारवाई करून बाणेर येथे छापा टाकला असता हॉटेल ग्रीनपार्क गेट समोर, बाणेर रोड, बाणेर पुणे येथे महिला नामे राबीया ऊर्फ सोनाली इंदादुल मंडल ही ०१ गुजरात राज्यातील व ०२ मुंबई शहरातील अशा एकुण ०३ मुलींकडून वेश्या व्यवसाय करून घेत असल्याची खात्रीशीर माहिती ही गोपनिय सुत्राकडून प्राप्त झाल्याने करण्यात आलेल्या कारवाईमध्ये ०३ मुलींची वेश्याव्यवसायतुन सुटका करण्यात आली.

सुटका करण्यात आलेल्या मुलींचेकडे चौकशी करुन त्यांना वेश्या व्यवसाया करीता आणल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना घेवुन महिला एजंट नामे राबीया ऊर्फ सोनाली इंदादुल मंडल यांचे विरुध्द चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ४१४/२०१९ इटपा ॲक्ट १९५६ चे क. ४,५, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला आरोपीला कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी कंडोम पाकीट, मोबाईल फोन, आधारकार्ड इत्यादी मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील एकुण ०३ पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, सपोनि अनिता खेडकर, सहा.पो. उपनिरीक्षक शेलार, पोहवा. राजाराम घोगरे, ज्ञानेश्वर देवकर, नरेश बलसाने, पोना. तुषार आल्हाट, पोशि. निलेश पालवे, मपोहवा. गितांजली जाधव, मपोना. सुप्रिया शेवाळे, रुपाली चांदगुडे यांनी कारवाई केली आहे.